डॉ. शैलजा मिलिंद कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः स्वेसेनि-२०१७/प्र.क्र.५३२/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २१ फेब्रुवारी, २०१८

वाचा :- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/डॉ. कुलकर्णी/स्वेसेनि/ टे.क्र.५/ २ब/ १४६४/१७, दि. २८/१२/२०१७.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेल्या डॉ. शैलजा मिलिंद कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, जिल्हा सामान्य रुग्णालय, पुणे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०४.०५.१९९० अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. डॉ. कुलकर्णी यांनी दि. २१/०९/२०१७ च्या अर्जान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. १० (५) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस दिलेली आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार डॉ. कुलकर्णी ह्या वयाची ३५ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी शासन सेवेत रुजू झालेल्या आहेत. तसेच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीसीच्या समाप्तीच्या दिनांकास त्यांनी वयाची ५४ वर्षे पूर्ण केलेली आहे. सबब, डॉ. कुलकर्णी यांनी दि. २१/०९/२०१७ च्या अर्जान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. १० (५) अन्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक १०

(५) (अ) मधील तरतुदींनुसार डॉ. शैलजा मिलिंद कुलकर्णी, वैद्यकिय अधिकारी, गट-अ, ह्या दि.२२/१२/२०१७ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्या असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२११४०४२१९५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.02.21 14:57:03 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे.
४) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, पुणे.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७) डॉ. शैलजा मिलिंद कुलकर्णी, वैद्यकिय अधिकारी यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांचे मार्फत)
८) निवडनस्ती सेवा-३.